पुण्यनगरी

# तंत्रज्ञान अधिविभागाचे तीन विद्यार्थी चीनला

कोल्हापूर : भारत आणि चीन यांच्यातील राजनैतिक संबंध स्थापनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चीन सरकारतर्फे भारतीय युवकांसाठी विद्यार्थी आदान-प्रदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या तीन विद्यार्थ्यांची चीन दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे. येत्या २० जूनला हे विद्यार्थी चीनकडे रवाना होणार आहेत.


राधिका पाटील


ओम कोळेकर


मुकुंद गायकवाड

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातून चीन दौऱ्यासाठी निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नावे अशी- राधिका संदीप पाटील (प्रथम वर्ष, बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी), ओम सचिन कोळेकर (तृतीय वर्ष, बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन) आणि मुकुंद गौतम गायकवाड (प्रथम वर्ष, एम.टेक. एनर्जी टेक्नॉलॉजी) या विद्यार्थ्यांचा चीन दौरा २० जून ते ४ जुलै २०२५ या कालावधीत पार पडणार असून, दौऱ्यादरम्यान त्यांना बीजिंग, शिजियाझुआंग आणि शांघाय शहरांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येणार आहे. या विशेष उपक्रमासाठी संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभाग समन्वयक डॉ. उदय पाटील यांनी परिश्रम घेतले.

पुण्यनगरी


प्रीतेश कंठी


ओंकार पाटील


तेजल पाटोळे


सृष्टी मोरे

# दूरशिक्षण विभागाच्या चार विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एमबीएमध्ये (डिस्टन्स मोड) शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांची विविध महत्त्वाच्या कंपन्यांत निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या रोजगार कक्षातर्फे कॅम्पस भरती शिबिर आयोजित करण्यात आले. त्यामध्ये विविध कंपन्या सहभागी झाल्या. विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये एमबीए (डिस्टन्स मोड) शिकणाऱ्या प्रीतेश महावीर कंठी आणि तेजल महेश पाटोळे या दोन विद्यार्थ्यांची मुथूट फायनान्स या नामांकित कंपनीमध्ये अनुक्रमे ज्युनिअर रिलेशनशिप एक्झिक्युटिव्ह आणि कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह म्हणून निवड झाली. तसेच ओंकार पाटील यांची अदानी समूहात सेल्स ट्रेनी म्हणून आणि सृष्टी मोरे यांची पुण्याच्या अक्वा चिल सिस्टीम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमध्ये एचआर/ मार्केटिंग इंटर्न म्हणून निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी अभिनंदन केले.

लोकमत

# दीडशेहून अधिक संख्याशास्त्रज्ञ आज विद्यापीठात येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संख्याशास्त्रातील योगदानाच्या सन्मानार्थ विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्यावतीने आज गुरुवार १९ ते २१ जून या कालावधीत 'अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत देश-विदेशांतील १५०हून अधिक संख्याशास्त्रज्ञ सहभागी होणार असून, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या बीजभाषणाने परिषदेस प्रारंभ होईल, अशी ही माहिती संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी दिली. डॉ. शिर्के १९९० साली संख्याशास्त्र अधिविभागात अधिव्याख्याता म्हणून रूजू झाले. गेल्या तीन दशकांमध्ये त्यांनी अधिविभागातील अध्यापनाबरोबरच संख्याशास्त्रातील मूलभूत संशोधनामध्ये जागतिक कामगिरी नोंदविली आहे. आघाडीच्या वित्तीय संस्थांनी प्रायोजित केलेले नऊ संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JUN 2025
लोकमत

# आठ वर्षांत विद्यापीठाने घडवले ५०० योग शिक्षक

## बाराही महिने मोफत धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आरोग्यासाठी योगा महत्त्वाचा असल्याने केंद्र व राज्य सरकारने योगाला पुन्हा एकदा मुख्य प्रवाहात आणले असले तरी या योगाचे महत्त्व शिवाजी विद्यापीठाने आधीच ओळखले आहे. आठ वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेला योग शिक्षक अभ्यासक्रम पूर्ण करत तब्बल ५०० जण योग शिक्षक बनले आहेत. आता हेच शिक्षक संपूर्ण जिल्हाभरात योगाचे धडे देत आहेत. विशेष म्हणजे गेल्या दहा वर्षांपासून विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात बाराही महिने रोज सकाळी योगाचे क्लास मोफत घेतले जातात. या माध्यमातूनही कोल्हापूरकरांनी योगसाधना अंगिकारली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने योग शिक्षक, एम. ए. योगशास्त्र व योग सर्टिफिकेट असे कोर्स चालविले जातात. एम. ए. योगशास्त्र हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम असून, आतापर्यंत २० विद्यार्थ्यांनी तो पूर्ण केला आहे. योग सर्टिफिकेट हा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम असून, ६००हून अधिक विद्यार्थ्यांनी त्याचे धडे घेतले आहेत. योग शिक्षक हा एक वर्षाचा अभ्यासक्रम आतापर्यंत ५०० विद्यार्थ्यांनी पूर्ण केला आहे. विशेष म्हणजे १७-१८ वर्षांच्या मुलांपासून ते नव्वदी पार नागरिकांपर्यंत या केंद्रातून योगाचे धडे घेतले आहेत.



शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने योग अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांना योगाचे असे धडे दिले जातात.

"आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने योगशिक्षक, एम. ए. योगशास्त्र व योग सर्टिफिकेट असे कोर्स चालविले जातात. या सर्वच अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद आहे.

**डॉ. रामचंद्र पवार**, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ.

## कोल्हापूरकरांची सकाळ योगाने

योगाचे धडे देणारे क्लासेस कोल्हापूर शहरात अनेक ठिकाणी आहेत. या क्लासेसमध्ये ठरावीक शुल्क घेऊन योग शिकवला जातो. मात्र, विद्यापीठात २०१२ पासून योगाचे मोफत धडे दिले जातात. जिजाऊ सभागृहात सूरज पाटील व दत्ता पाटील हे योग शिक्षक नागरिकांना योग शिकवतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
19 JUN 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात जमणार राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्रज्ञांची मांदियाळी

## तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेस उद्या प्रारंभ

कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज ):

शिवाजी विद्यापीठात उद्यापासून (दि. १९) सुरू होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेच्या निमित्ताने देशभरातील विद्वान संख्याशास्त्रज्ञांसह निवडक आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संख्याशास्त्रज्ञांची मांदियाळी विद्यापीठाच्या प्रांगणात जमणार आहे. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. शशीभूषण महाडिक यांनी ही माहिती दिली.

शिवाजी विद्यापीठात उद्यापासून अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. परिषदेमध्ये विशेष परिसंवादांसह निमंत्रितांची मार्गदर्शन सत्रे आणि अभ्यासक, संशोधकांची सहभाग सत्रेही होणार आहेत. या निमित्ताने संख्याशास्त्राच्या क्षेत्रातील जागतिक प्रवाहांची वेधक आणि वेचक चर्चा परिषदेत होणार आहे. त्यासाठी भारताच्या विविध शैक्षणिक संस्थांसह शासन तसेच खासगी क्षेत्रात कार्यरत असणारे आघाडीचे संख्याशास्त्रज्ञ, संशोधक आणि अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. त्याखेरीज आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्रज्ञही येणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ प्रा. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या या परिषदेत प्रारंभी ज्येष्ठ समाजसेवक, विचारवंत डॉ. अभय बंग हे लोकांसमवेत संशोधन' या वेगळ्या विषयावर बीजभाषण करतील. या सत्राच्या अध्यक्षस्थानी पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे असतील. त्यानंतरच्या विशेष सत्रात डॉ. गोरे हे जटायू फेल्स अगेन' या विषयावर बोलतील. त्यांच्यासमवेत अमेरिकेच्या मिसिसिपी स्टेट विद्यापीठातील डॉ. प्रकाश पाटील हे ऑन पॅरामेट्रिकली गायडेड नॉन-पॅरामेट्रिक एस्टीमेशन' या विषयावर बोलतील. भारतातील ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ प्रा. आर.एन. रट्टीहळ्ळी या सत्राचे अध्यक्षस्थान भूषवतील.

या परिषदेमध्ये मलेशियामधील सेन्स मलेशिया पेनांग विद्यापीठातील प्रा. मायकेल बी.सी. खू, रिव्हरसाइड (अमेरिका) येथील कॅलिफोर्निया विद्यापीठातील प्रा. आशिष सेनगुप्ता, ग्रीसमधील पायरेयस विद्यापीठातील प्रा.एथनासिओसिस सी. रॅकिझिस, अमेरिकेतीलच टेक्सास विद्यापीठातील संशोधक व कर्करोगतज्ज्ञ प्रा. संजय शेटे आणि सांता बार्बरा येथील कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रा. एस. राव जम्मालमकडा हे सहभागी होतील. त्यांच्याखेरीज भारताच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सोनाली अडकी, मधुसूदन अडकी, केंद्रीय नॅशनल सँपल सर्व्हे कार्यालयाचे शिवाजी पाटील, जयप्रकाश होनराव, वेदांत कोंडकर, आयआयटी-मुंबईचे प्रा. ए. सुब्रमण्यम, प्रा. संजय सबनीस, बडोदा विद्यापीठाचे प्रा. के. मुरलीधरन, पार्कर एव्हरी उद्योगसमूहाचे दिनेश हेलवाडे, इन्स्टिट्यूट ऑफ सिस्टीम्सचे यशवंत महाकाल, आयआयटी-तिरुपतीचे प्रा. एन. बालकृष्णा, आयआयएससी बॅंगलोरचे प्रा. शिरीष शेवडे, पुणे विद्यापीठाचे प्रा. माणिक आवळे, प्रा. यू.व्ही. नाईक-निंबाळकर, आय एम स्टील अलाइन्स'चे सयाजी हांडे, पुण्याच्या सिम्बायोसिस येथील शर्वरी शुक्ला, बजाज फिनसर्वचे शिवाजी डिसले, बेंगलोर विद्यापीठातील प्रा. एच. जे वामन, प्रा. परमेश्वर पंडित, पंजाबमधील प्लाक्ष विद्यापीठाचे प्रा. टी.व्ही. सामनाथन, जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील प्रा. किर्ती कमलजा, प्रा. रामकृष्ण शिंदे, कलबुर्गी येथील गुलबर्गा विद्यापीठाचे प्रा. बी.व्ही. धांद्रा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील प्रा. विकास घुटे, धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाच्या प्रा. सुरेखा मुनोळी, प्रा. शारदा भट, मुंबई विद्यापीठाच्या प्रा. वैजयंती दीक्षित, मैसूर विद्यापीठाचे प्रा. एस. रवी, पुण्याच्या एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठाचे प्रा. हेमंत कुलकर्णी, नवी मुंबईचे प्रा. ए.बी. जाधव, पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्रा. के.एस. शेंडे, सांगोला महाविद्यालयाचे प्रा. ओ.डी. घोंगडे यांच्यासह शिवाजी विद्यापीठासह परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील संख्याशास्त्राचे शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थीही परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

पुढारी

# विद्यापीठात शनिवारी 'योग संगम' कार्यक्रम

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी (दि. २१) सकाळी ६.१५ वाजता 'योग संगम' कार्यक्रम विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. वेळी कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.



पुढारी

# विद्यापीठात आजपासून आंतरराष्ट्रीय परिषद

कोल्हापूरः शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या संख्याशास्त्रातील योगदानाच्या सन्मानार्थ विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्यावतीने दि. १९ ते २१ जून या कालावधीत 'अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत देशविदेशांतील १५०हून अधिक संख्याशास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या बीजभाषणाने परिषदेस प्रारंभ होणार असल्याची माहिती संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी दिली. मिनिस्ट्री ऑफ स्टॅटिस्टिक्स अँड प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन (भारत सरकार), रिझर्व बँक ऑफ इंडिया, नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमॅटिक्स, आणि अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन यांच्या वित्तीय सहाय्याद्वारे ही परिषद होत आहे. परिषदेसाठी अमेरिका, मलेशिया, आणि ग्रीस येथील नामवंत संख्याशास्त्रज्ञांना निमंत्रित वक्ते म्हणून येणार आहेत. देशातील विविध विद्यापीठांमधूनही १५० हून अधिक संख्याशास्त्रज्ञ परिषदेत सहभागी होणार आहेत.

पुढारी



कोल्हापूर : वसतिगृहास देणगी धनादेश व पत्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना प्रा. अरविंद परांडेकर. यावेळी डॉ. गिरीश कुलकर्णी, प्रियांका सुर्वे, सुहासिनी पाटील, गिरीश सुर्वे, पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे व इतर.

# लोकस्मृती वसतिगृहास सव्वापाच लाखांची देणगी

## परांडेकर बंधू-भगिनींकडून धनादेश सुपूर्द

कोल्हापूर, ता. १८ : प्रा. अरविंद शंकर परांडेकर आणि त्यांच्या भगिनी कुंदा कृष्णकांत देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे अनुक्रमे पाच लाख आणि २५ हजार रुपयांच्या देणगीचे धनादेश सुपूर्द केले.

प्रा. परांडेकर हे सध्या बाबूजमाल दर्ग्याजवळील परांडेकर वाडा येथे राहतात. सावंतवाडी येथील पंचम खेमराज महाविद्यालयात ते वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. २००५ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. परांडेकर यांनी पत्नी अरुंधती यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहासाठी पाच लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला. बंधूंच्या प्रेरणेतून त्यांच्या भगिनी कुंदा यांनीही मातोश्री विमलाबाई परांडेकर यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनी वसतिगृहासाठी २५ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश दिला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी प्रा. परांडेकर यांच्याकडून दोघांच्या देणगी निधीचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला, तसेच त्यांचा ग्रंथभेट देऊन गौरवही केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, फिरोज नायकवडी, गिरीश सुर्वे, प्रियांका सुर्वे, राहुल शिंदे उपस्थित होते.

सकाळ

# कुलसचिव डॉ. शिंदे यांना करवीर भूषण पुरस्कार



डॉ. व्ही.एन. शिंदे

कोल्हापूर : येथील रोटरी क्लब ऑफ करवीरने शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव तथा विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना 'करवीर भूषण' पुरस्कार जाहीर केला. क्लबचे प्रेसिडेंट कुशल पटेल आणि सेक्रेटरी नारायण भोई यांनी याविषयीची घोषणा केली. कुलसचिव डॉ. शिंदे यांचे शैक्षणिक, प्रशासकीय कार्य, विज्ञान लेखनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम आणि जलसंवर्धनविषयक जनजागृतीसाठी त्यांनी चालविलेले कृतिशील उपक्रम या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. रेसिडेन्सी क्लबमध्ये शुक्रवारी (ता. २०) महासंचालक प्रतिनिधी राजूभाई दोशी यांच्या हस्ते आणि सहाय्यक गव्हर्नर गिरीष जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत 'चार्टर नाईट' समारंभात पुरस्कार प्रदान करण्यात येईल. कुलसचिव डॉ. शिंदे अनेक वर्षे विज्ञान लेखनाच्या माध्यमातून वैज्ञानिक प्रसार व जागृतीचे कार्य करीत आहेत. 'एककांचे मानकरी', 'हिरव्या बोटांचे किमयागार', 'असे घडले भारतीय शास्त्रज्ञ', 'आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया' आदी पुस्तकांचे त्यांनी लेखन केले आहे.

सकाळ

# 'तंत्रज्ञान'च्या तीन विद्यार्थ्यांची चीन दौऱ्यासाठी निवड

कोल्हापूर : भारत आणि चीन यांच्यातील राजनैतिक संबंध स्थापनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चीन सरकारतर्फे भारतीय युवकांसाठी विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या तीन विद्यार्थ्यांची चीन दौऱ्यासाठी निवड झाली आहे. २० जूनला हे विद्यार्थी चीनकडे रवाना होणार आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये राधिका संदीप पाटील (प्रथम वर्ष, बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी), ओम सचिन कोळेकर (तृतीय वर्ष, बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन) आणि मुकुंद गौतम गायकवाड (प्रथम वर्ष, एम.टेक. एनर्जी टेक्नॉलॉजी) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांचा चीन दौरा २० जून ते ४ जुलै २०२५ या कालावधीत असून, दौऱ्यादरम्यान त्यांना बीजिंग, शिजियाझुआंग आणि शांघाय शहरांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येणार आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभाग समन्वयक डॉ. उदय पाटील यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

# दूरशिक्षण केंद्राच्या 'एमबीए' विद्यार्थ्यांची कंपन्यांत निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.बी.ए.मध्ये (डिस्टन्स मोड) शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांची विविध महत्त्वाच्या कंपन्यांत निवड झाली. त्यात प्रीतेश महावीर कंठी, तेजल महेश पाटोळे, ओंकार पाटील आणि सृष्टी मोरे यांचा समावेश आहे. विद्यापीठाचा रोजगार कक्ष आयोजित कॅम्पस भरती शिबिरात विविध कंपन्या सहभागी झाल्या. विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये एमबीए (डिस्टन्स मोड) शिकणाऱ्या प्रीतेश आणि तेजल यांची मुथुट फायनान्स या नामांकित कंपनीमध्ये अनुक्रमे ज्युनिअर रिलेशनशिप एक्झिक्युटिव्ह आणि कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह म्हणून निवड झाली. ओंकार याची अदानी समूहात सेल्स ट्रेनी म्हणून आणि सृष्टी हिची पुण्याच्या अक्वा चिल सिस्टिम्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमध्ये एच. आर./मार्केटिंग इंटर्न म्हणून निवड झाली आहे. या एम.बी.ए. (दूरशिक्षण) अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता असल्याचे दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी सांगितले.

तरूण भारत

# डॉ. व्ही. एन. शिंदे यांना करवीर भूषण पुरस्कार जाहीर



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव तथा विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना येथील रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्यावतीने 'करवीर भूषण" पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. क्लबचे प्रेसिडेंट कुशल पटेल आणि सेक्रेटरी नारायण भोई यांनी ही घोषणा केली आहे. शुक्रवारी २० रोजी ताराबाई पार्क येथील रेसिडेन्सी क्लबमध्ये पुरस्कार वितरण होईल. महासंचालक प्रतिनिधी राजूभाई दोशी यांच्या हस्ते,सहाय्यक गव्हर्नर गिरीष जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम होईल. डॉ. व्ही.एन.शिंदे यांचे शैक्षणिक, प्रशासकीय कार्य, विज्ञान लेखनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम आणि जलसंवर्धनविषयक जनजागृती याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात येत आहे. डॉ. शिंदे हे गेली अनेक वर्षे विज्ञान लेखनाच्या माध्यमातून वैज्ञानिक प्रसार व जागृतीचे कार्य करीत आहेत. एककांचे मानकरी, हिरव्या बोटांचे किमयागार, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया, एककांचे इतर मानकरी, कृषीक्रांतीचे शिलेदार आणि भावणारी झाडे ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. त्यासाठी डॉ. शिंदे यांना महाराष्ट्र शासनाचा महात्मा जोतीराव फुले पुरस्कारासह विविध पुरस्कार मिळाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
19 JUN 2025 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील लोकस्मृती वसतिगृहाला बहीण-भावाची सव्वापाच लाखांची देणगी

## विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्केंकडे धनादेश सुपूर्द

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्येष्ठ नागरिक प्रा. अरविंद परांडेकर आणि त्यांच्या भगिनी कुंदा देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५ लाख २५ हजार रूपयांची देणगी दिली आहे. देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला आहे.

प्रा. अरविंद परांडेकर हे सध्या कोल्हापूरच्या बाबूजमाल दर्ग्याजवळील परांडेकर वाडा येथे राहतात. सावंतवाडी येथील पंचम खेमराज महाविद्यालयात ते वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. २००५ मध्ये ते सेवानिवृत्त झाले आहेत. परांडेकर यांनी पत्नी अरुंधती अरविंद परांडेकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहासाठी पाच लाखांच्या देणगीचा धनादेश दिला. बंधूंच्या प्रेरणेतून



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना प्रा. अरविंद परांडेकर. सोबत डॉ. गिरीष कुलकर्णी, प्रियांका सुर्वे, डॉ. सुहासिनी पाटील, गिरीष सुर्वे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

त्यांच्या भगिनी श्रीमती कुंदा कृष्णकांत देशपांडे यांनीही मातोश्री कै. विमलाबाई शंकर परांडेकर यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनी वसतिगृहासाठी २५ हजारांच्या देणगीचा धनादेश दिला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी प्रा. परांडेकर यांच्याकडून दोघांच्या देणगी निधीचा स्वीकार केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, रणजीत यादव, फिरोझ नायकवडी, गिरीष सुर्वे, प्रियांका सुर्वे, राहुल शिंदे उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठ तंत्रज्ञान विभागाचे तीन विद्यार्थी चीनला जाणार

## अदान - प्रदान कार्यक्रमांतर्गत २० जून ते ४ जुलै दरम्यान चीन दौरा


राधिका पाटील


ओम कोळेकर


मुकुंद गायकवाड

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारत आणि चीन यांच्यातील राजनैतिक संबंध स्थापनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चीन सरकारतर्फे भारतीय युवकांसाठी विद्यार्थी अदान – प्रदान कार्यक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या तीन विद्यार्थ्यांची चीन दौऱ्यासाठी निवड झाली. येत्या २० जूनला हे विद्यार्थी चीनकडे रवाना होणार आहेत.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातून चीन दौऱ्यासाठी राधिका पाटील (प्रथम वर्ष, बी. टेक. फूड टेक्नॉलॉजी), ओम कोळेकर (तृतीय वर्ष, बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन) आणि मुकुंद गायकवाड (प्रथम वर्ष, एम. टेक. एनर्जी टेक्नॉलॉजी) यांची निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांचा चीन दौरा २० जून ते ४ जुलै या कालावधीत आहे. चीनमध्ये बीजिंग, शिजियाझुआंग आणि शांघाय शहरांमध्ये सांस्कृतिक, शैक्षणिक, ऐतिहासिक, सामाजिक कार्यक्रमांत सहभागी होणार आहे. यामध्ये चिनी भाषा व संस्कृती वर्ग, युवा संवाद मंच, ऐतिहासिक स्थळदर्शन, संग्रहालय भेटी, चहा संस्कृती अनुभव आणि भारतीय दूतावास भेट अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांचा निवास, भोजन, देशांतर्गत प्रवास आणि शैक्षणिक उपक्रमांचा संपूर्ण खर्च चीन सरकारतर्फे केला जाणार आहे. या विशेष उपक्रमासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र – कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभाग समन्वयक डॉ. उदय पाटील यांनी परिश्रम घेतले.

तरूण भारत

# ऑनलाईन एमबीएच्या चार विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) मध्ये शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड झाली. विद्यापीठाच्या रोजगार कक्षातर्फे कॅम्पस भरती शिबिर आयोजित केले होते. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये एमबीए (डिस्टन्स मोड) शिकणाऱ्या प्रीतेश कंठी, तेजल पाटोळे, ओंकार पाटील, सृष्टी मोरे, या विद्यार्थ्यांची निवड झाली. सर्व विद्यार्थ्यांचे दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी अभिनंदन केले.

तरूण भारत

# रणजित भोसले यांना पीएच. डी.

कोल्हापूर : रणजित भोसले यांना शिवाजी



विद्यापीठाची पीएच. डी. पदवी जाहीर झाला. त्यांनी 'ए स्टडी ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इन हॉस्पिटल एडमिनिस्ट्रेशन ऑफ मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल्स इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. त्यांना डॉ. यु. एम. देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या ते केआयटीमध्ये सहायक प्राध्यापक आहेत. डॉ. ए. एम. गुरव, केआयटीचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन, सचिव दीपक चोगुले, संचालक सुनील कुलकर्णी, भरत पाटील, दिलिप जोशी, शिल्पजा कगुटकर, कर्नल प्रतापसिंह रावराने, एस. एम. खाडिलकर यांचे सहकार्य लाभले.